**PRC/PR/40/2025**

# Passenger Safety First: MMRDA's Immediate and Long-Term Measures

**Mumbai, 20 August 2025 –**

The safety of our Monorail passengers remains our highest priority. Following yesterday's incident, the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) and Maha Mumbai Metro (MMMOCL) swiftly initiated both short-term and long-term measures to ensure passenger safety and to prevent any recurrence of such events.
We want to reassure all commuters that MMRDA is fully committed to providing safe and reliable travel experience. Clear instructions have been issued to MMMOCL to strengthen safety systems and operational vigilance. MMRDA have taken short term and long-term measures.

## Immediate Measures

### 1. Passenger Load Regulation:
Monorail coaches are designed for a maximum load of 104 tons. To avoid exceeding this capacity, station staff have been instructed to strictly regulate passenger entry. If overcrowding is observed, trains will be halted and passengers safely deboarded before resuming operations.

### 2. Additional Staff Deployment:
Each train will now carry dedicated security personnel to monitor in-coach crowding. Alongside the Monorail Pilot, a trained technician will also travel to handle any technical issues promptly.

### 3. Emergency Window Checks & Labelling:
Every Monorail has 8 ventilation windows (2 in each of the 4 coaches). These are being immediately inspected and clearly labelled for easy identification so that passengers remain calm and guided in case of emergencies.

### 4. Enhanced Signage:
Clear, visible signboards have been installed inside trains, instructing passengers on safety protocols and emergency exits. More signage will be added to make instructions even more prominent and accessible.

**5. Comprehensive Safety Inspections:**
The Director (Maintenance) has been tasked with conducting thorough inspections of all Monorail trains to ensure all safety measures are being strictly implemented.

**Long-Term Measures**

**Introduction of New Rakes:**
MMRDA has already procured 10 new Monorail rakes. Seven of these have reached the depot and are undergoing detailed trials and certification. Once cleared, they will be added to passenger service, increasing capacity and reducing strain on the existing fleet.
Monorail continues to be an important mode of transport for Mumbaikars. From emergency fixes to the induction of new trains, every step we take is aimed at ensuring a safer, more comfortable, and trustworthy journey.
It is important to note that during yesterday's incident, not a single passenger was injured. All commuters were safely evacuated — a reflection of the swift response by our teams. We sincerely thank the Municipal Corporation and the Fire Brigade for their prompt support.

**MMRDA remains deeply committed to passenger safety and comfort. We will continue to strengthen our systems so that every Mumbaikar can travel with complete confidence.**

---

## प्रवासी सुरक्षितता प्रथम: एमएमआरडीएच्या अंशकालीन तसेच दीर्घकालीन उपाययोजना

**मुंबई, २० ऑगस्ट २०२५-**

मोनोरेल प्रवाशांची सुरक्षितता ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. काल घडलेल्या घटनेनंतर एमएमआरडीएने आणि एमएमएमओसीएलने प्रवाशांची गैरसोय होऊ नये तसेच अशा घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी एमएमआरडीएने अंशकालीन तसेच दीर्घकालीन उपाययोजना हाती घेतल्या आहेत. प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत आम्ही पूर्णपणे बांधील आहोत. तसेच अशा घटनेची पुनरावृत्ती होणार नाही याची सर्वतोपरी काळजी घेण्याचे आदेश महा मुंबई मेट्रोला एमएमआरडीएने दिले आहेत. याकरीता एमएमआरडीने अंशकालीन आणि दीर्घकालीन उपाय योजना हाती घेतल्या आहेत.

**अंशकालीन उपाययोजना**

**१. अतिरिक्त प्रवासी नियंत्रण**

मोनोरेलची क्षमता १०४ टनांपर्यंत आहे. पण मोनोरेल गाड्यांचे एकूण आयुर्मान पाहता तसेच त्यांची परिवहन क्षमता पाहता यापुढे कोणत्याही गाडीत प्रवासी संख्येची मर्यादा ओलांडली जाऊ नये याची काळजी घेतली जाणार आहे. आणि ही प्रवासी क्षमता १०२ ते १०४ दरम्यान इतकीच राहिल यापेक्षा वाढणार नाही यासाठी स्टेशनवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. गाडीत प्रवासी क्षमतेपेक्षा जास्त गर्दी झाल्यास प्रवाशांना सुरक्षितपणे उतरवून नंतरच गाडी पुढे सोडण्याचे निर्देश दिले आहेत.

**२. अतिरिक्त कर्मचारी तैनात:**

प्रत्येक ट्रेनमध्ये एक सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आला आहे, जो आतील गर्दीवर लक्ष ठेवेल. तसेच मोनो पायलटसह एक टेक्निशियनही पाठवला जाणार आहे.

**३. आपत्कालीन खिडक्यांची तपासणी व लेबलिंग**

प्रत्येक मोनोरेलमध्ये ४ डबे असून प्रत्येक डब्यात २ व्हेंटिलेशन खिडक्या आहेत — म्हणजे एका गाडीत एकूण ८ खिडक्या. या खिडक्यांची तातडीने तपासणी करून त्यांचे स्पष्ट लेबलिंग करण्याचे आदेश दिले आहेत, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांनी घाबरुन न जाता संयम बाळगावा.

**४. अधिक सक्षम सूचना फलकांची उभारणी**

आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांनी काय करावे, सुरक्षित मार्ग कुठला आहे, याबाबत स्पष्ट माहिती असलेले सूचना फलक गाड्यांमध्ये लावण्यात आले आहेत. त्यात वाढ करण्याचे आदेश देण्यात आले आहेत म्हणजे या सुचना अधिक ठळकपणे सहज प्रवाशांना दिसतील.

**५. सुरक्षा तपासणी**

मोनोरेलच्या सर्व गाड्यांची तातडीने तपासणी करण्याचे डायरेक्टर मेंटेनन्स यांना देण्यात आले आहेत. यामुळे वरील सर्व बाबी काटेकोरपणे अंमलात येतील.

**दीर्घकालीन उपाययोजना**

मोनोरेलसाठी नव्या १० गाड्या मागवण्यात आल्या आहेत. पैकी ७ गाड्या डेपोमध्ये दाखल झाल्या असून त्यांची तपासणी आणि ट्रायल सुरु आहे. या ट्रायलनंतर सर्टिफिकेशन प्रक्रिया पूर्ण होईल आणि मग या गाड्या सेवेत दाखल केल्या जातील. त्यामुळे प्रवासी क्षमता वाढेल आणि उपलब्ध मोनोगाड्यांवरील ताण कमी होईल.

मोनोरेल हे मुंबईकरांसाठी एक महत्त्वाचे सार्वजनिक परिवहन साधन आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी व सोयीसाठी आम्ही सातत्याने उपाययोजना करत आहोत. अल्पकालीन दुरुस्तीपासून ते नव्या गाड्यांच्या समावेशापर्यंत — प्रत्येक पाऊल हे प्रवाशांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि सुखकर प्रवास मिळावा यासाठीच आहे.

**कालच्या घटनेनंतर एकही प्रवासी जखमी न होता सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले, ही आमच्यासाठी मोठी दिलासादायक बाब आहे.आम्ही मुंबई महानगरपालिका प्रशासन आणि अग्निशमन दलाचे आभारी आहोत**

---